# एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय, शहादा

ता. शहादा,जि. नंदुरबार

Email : shahadacdpo@gmall.com

जा.क्र. / एबाविसेयो /शहादा / आस्था 130 / 2025 दि.17 ऑक्टोंबर 2025

**संदर्भ-** 1.शासन निर्णय क्र.एबावि-2022 /प्र.क्र.94/का-6 दिनांक 02 फेब्रुवारी 2023

2.शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र94/का-6 दिनांक 02 मे 2023

3.शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6 दिनांक 11ऑगस्ट 2023

4.शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6 दिनांक 13 डिसेंबर 2023

5. शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6 दिनांक 27 फेब्रुवारी 2024

6. शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6 दिनांक 30 जानेवारी 2025

7.आयुक्त एबाविसेयो महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे पत्र एबाविसेयो/अंगणवाडी/का-7/2024-25 /517 दि.31/01/2025

8.आयुक्त एबाविसेयो महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे पत्र एबाविसेयो/अंगणवाडी /का - 07/से.म./पदभरती/ 2025-26/4626 नवी मुंबई दि.04/09/2025

9.मा.जिल्हा कार्यकारी अधिकारी यांच्या कडील पत्र जाक्र.जिप/मबावि/आस्था /810/ 2025 दि.08/09/2025

10.आयुक्त एबाविसेयो महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे पत्र एबाविसेयो/अंगणवाडी /का -07 /से.म./ पदभरती/2025-26/4640 नवी मुंबई दि.09/09/2025

11. कार्यालयीन मंजूर टीपणी दि. 17/10/2025

## अंगणवाडी मदतनीस रिक्त पदे भरती जाहिरात-2025

एकात्मिक बाल विकास सेवा योजना,अंतर्गत **बाल विकास प्रकल्प अधिकारी शहादा , ता.शहादा** यांचे अधिनस्त अंगणवाडी मदतनिस यांची रिक्त पदे भरती करण्यासाठी,जाहिरातीमध्ये नमूद रिक्त पदांवर एकत्रित मानधनी तत्त्वावर सरळ नियुक्तीने (By Nomination) पद भरण्यासाठी ,अंगणवाडी मदतनीस पद रिक्त असलेल्या महसुली गावातील रहीवाशी असलेल्या पात्र महिला उमेदवारांकडून **दि. 24/10/2025 ते 07/11/2025 या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून )** कार्यालयीन वेळेत खालील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज मागविण्यात येत आहेत.

**रिक्त पदांची माहिती –**

| अ.क्र. | अंगणवाडी केंद्राचे नांव | रिक्त पद | संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | असलोद क्र. 2 | मदतनिस | 1 | |
| 2. | कर्जोत क्र. 1 | मदतनिस | 1 | |
| 3. | सारंगखेडा क्र. 1 व 2 | मदतनिस | 2 | |
| | एकूण | | 4 | |

Scanned by CamScanner

अटी व शर्ती :

१. पात्र व इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यात **अर्ज दिनांक 24/10/2025 ते 07/11/2025 पर्यंत** कार्यालयीन वेळेत **(सुट्टीचे दिवस वगळून)** बालविकास प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बालविकास सेवा योजना शहादा, ता. शहादा यांचे कार्यालयात **उमेदवाराने स्वतः समक्ष सादर करणे आवश्यक आहे.** (सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.) उपरोक्त नमूद दिनांक व वेळेनंतर या कार्यालयामार्फत कोणतेही उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

२. **शैक्षणिक पात्रता :-** अंगणवाडी मदतनिस पदासाठी इयत्ता **12 वी उत्तीर्ण** (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी **किमान** शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.

३. **वास्तव्याची (स्थानिक रहिवाशी असणे) अट :-** उमेदवार महिला स्थानिक रहिवाशी असावी. स्थानिक रहिवाशी म्हणजेच अर्जदार महिला ही अंगणवाडी केंद्र असलेल्या महसुली गावातील ग्रामपंचायत नव्हे ज्यात महसुली गाव/वाडी/वस्ती/पाडे यासह स्थानिक रहिवाशी असणे आवश्यक आहे.यासाठी अर्जासोबत स्वयंघोषणापत्र व रहिवासी पुरावा जोडावा. स्थानिक रहिवासीबाबत पेच/ तक्रार प्राप्त झाल्यास सक्षम प्राधिकारी यांचा रहिवासी दाखला देणे बंधनकारक राहिल.

४. **वयाची अट व पुरावा :-** अंगणवाडी मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे राहिल. तथापि विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्षे राहिल. वयाचा पुरवा म्हणुन शाळा सोडल्याचा दाखला / 10 वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र /जन्म नोंद दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील. उमेदवाराचे किमान व कमाल वय हे अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास गणण्यात येईल.

५. **लहान कुटुंब :-** लहान कुटुंबाकरीता दि.27/02/2024 चा शासन निर्णय लागु राहील ,वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबा बाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल.

६. **मराठी भाषेचे ज्ञान :-** मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवाराने नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. सदर अंगणवाडी केंद्रातील 50% हुन अधिक मुले मराठी भाषेव्यतिरिक्त इतर भाषा (शासन निर्णयात नमूद केल्या प्रमाणे) बोलणारे असतील तर त्या भाषेचे ज्ञान (लिहिता व वाचता येणे) उमेदवारास असणे आवश्यक आहे.

७. **उमेदवार विधवा असल्यास :-** पतीचे मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र व विधवा असल्या बाबत विहित नमुन्यात स्वयं घोषणा प्रमाणपत्र दोन्ही जोडणे आवश्यक आहे.

८. **उमेदवार अनाथ असल्यास :-** संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग/सक्षम प्राधिकारी यांचे कडील प्रमाणपत्र जोडावे.

९. **मागासवर्गीय असल्यास :-** अनुसूचित जाती/ अनसूचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती / भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या / प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

१०. **अनुभव :-** उमेदवारास शासन यंत्रणेतील अंगणवाडी सेविका,मिनी अंगणवाडी सेविका व मदतनिस म्हणुन कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असल्याशिवाय अनुभवासाठी असलेले गुण देण्यात येणार नाहीत. असा अनुभव उमेदवारांस असल्यास त्याबाबतचे बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित / विना अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

Scanned by CamScanner

११. **एका उमेदवाराने एका पदासाठी एकच अर्ज** सादर करावा. उमेदवाराने **एका पदासाठी** वेगवेगळे अर्ज सादर केल्यास प्रथम प्राप्त एकच अर्ज विचारात घेण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. अर्जा सोबत आवश्यक कागदपत्र जोडलेले नसणे,महसुली गावाचे नांव, पदाचे नांव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहित ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ.कारणांमुळे अर्ज पात्र /अपात्र ठरविण्या बाबत अंतिम अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना राहतील. त्यासंबंधी उमेदवारांस कळविण्यात येणार नाही.

१३. **अंतिम दिनांकानंतर** (दि.07/11/2025 नंतर) आलेल्या किंवा डाकेने (पोस्टाने) प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही व उमेदवाराने अर्ज प्रत्यक्ष कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

१४. **निवड कार्यपध्दती :-** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6, दिनांक 30.01.2025 च्या परिशिष्ट नुसार उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता 12वी/ पदवीधर /पदव्युत्तर/ डिएड /बीएड /संगणक परिक्षा/ विधवा/ अनाथ/ अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती / भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग/ अंगणवाडी सेविका/ मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणुन कमीत कमी 2 वर्षांचा अनुभव या बाबींच्या आधारे गुण दिले जाणार आहे. उमेदवारास मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यात येईल. या पदांकरीता लेखी परिक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणा-या उमेदवारांना आक्षेप / तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी 10 दिवसांचे आंत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी शहादा, ता.शहादा कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारींची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. निवड प्रकियाचे वेळापत्रक यासोबत देण्यात आले आहे.

१५. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात / किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल, अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१६. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१७. अंगणवाडी मदतनिस यांना शासकिय नियमानुसार एकत्रित मानधन देय राहील, शासनाने वेळोवळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय नाही. अंगणवाडी मदतनीस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे.

१८. अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे मदतनिस यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना त्या कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही, तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल.

१९. **प्रतिक्षा यादी :** एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनाकांपासुन 30 दिवसांत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मिती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणानुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहिल.

Scanned by CamScanner

२०. **अपिल:**मदतनिस या पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड घोषित झाल्यापासुन 30 दिवसांचे आंत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचेकडे तक्रार करता येईल व .मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास मा.विभागीय आयुक्त (महसूल) विभाग नाशिक यांचेकडे पुढील 60 दिवसांत अपिल दाखल करता येईल.

२१. **सेवा समाप्तीसाठी वयाची अट :** नियुक्त होणा-या अंगणवाडी मदतनीस यांना दि.13 डिसेंबर 2023 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे सेवानिवृत्तीचा दिनांक निश्चित केलेला आहे.

२२. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्दयाबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास उपरोक्त संदर्भ क्र.1 ते 10 रोजीच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.

२३. **पत्रव्यवहार :-** भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.

२४. **महत्त्वाची सुचना :-** सदर भरती प्रक्रिया उपरोक्त संदर्भ क्र.1 ते 6 अन्वये राबविण्यात येणार असुन नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे. करीता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडू नये.

२५. **अर्ज सादर करण्याचा पत्ता :-** बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय प्रकल्प शहादा, ता. शहादा ,जि. नंदुरबार

२६. सदर जाहिरातीत काही बदल अटी/नियम वाढविणे/रद्द/पुढे ढकलणे या बाबत सर्व अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी, प्रकल्प शहादा, ता.शहादा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे. याबाबत कोणतेही दावे किंवा तक्रार यांची दखल घेण्यात येणार नाही. तसेच निवड होणाऱ्या उमेदवाराची नेमणूक अस्थायी स्वरुपाची असल्याने ज्या केंद्रात नेमणूक करण्यात आलेली आहे तेथे यापूर्वीच्या अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणाबाबत तसेच वरिष्ठ कार्यालयात निवडी संबंधाने अपील करण्यात आलेल्या प्रकरणाबाबत आपणास निकाल मान्य असेल. यानुसार सदर पदावर आपला कोणत्याही प्रकारे कायम हक्क राहणार नाही किंवा मानधनी सेवेतून कमी करण्यास आपण पात्र असेल याबाबत आपली कोणतेही तक्रार राहणार नाही.

**ठिकाण :** शहादा
**दिनांक :** 17/10/2025

(सागर अशोक चौधरी)
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
प्रकल्प कार्यालय शहादा, ता.शहादा

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>**
१)मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नंदुरबार
२)मा.जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) जिल्हा परिषद नंदुरबार
3) मा. मा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती, शहादा ता.शहादा जि.नंदुरबार

**प्रत माहितीसाठी व आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्धीसाठी**
ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत...........................

(सागर अशोक चौधरी)
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
प्रकल्प कार्यालय शहादा, ता.शहादा

Scanned by CamScanner